**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६२/२०१७-१८/६४ दिनांक: २७.०३.२०१८

**आदेश**
**आदेश केस क्र. ६२ /२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री प्रकाश दत्तात्रय वळीवडे<br>मु.पो. तळसंदे ता. हातणकंगले<br>जि. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग कोडोली | **विरुध्द पक्षकार** |

**कोरम:**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

27/3/2018

१. तक्रारदार श्री प्रकाश दत्तात्रय वळीवडे यांचे नावे शेती पंपाचे ५ अश्वशक्तीचे कनेक्शन असून त्यास मीटरद्वारे वीज पुरवठा चालू आहे. सदरचे कनेक्शन दिनांक १८.०३.२०१४ रोजी घेतलेले असून डिसेंबर २०१६ पूर्वीची बिले चुकीचे व अंदाजे मीटर वाचन टाकून देण्यात आलेली आहेत. त्यानंतर माहे डिसेंबर २०१६ च्या बिलामध्ये एकत्रित १७९३७ युनिटचे बिल दिलेले आहे. त्यामुळे सदचे बिल १० हप्त्यामध्ये भरण्यास आदेश व्हावेत ही विनंती. सदरचे हप्ते चालू बिलाबरोबर तिमाही भरणेकरिता परवानगी मिळावी. अशी ग्राहकाची मागणी आहे.

वि.प.तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री अमर कोळी , उपविभाग कोडोली यानी आपले म्हणणे खालील प्रमाणे मांडले.

श्री प्रकाश दत्तात्रय वळीवडे ग्राहक क्र. २०१८००४७७८२ यांचे माहे डिसेंबर २०१६ चे कृषी पंपाचे वीज देयक जास्त असलेबाबत तक्रार अर्ज केला आहे.

सदर देयकाच तपासणी केली असता सदर देयकावरील उपलब्ध फोटो व देयकावरील चालू मीटर वाचन यात कोणतीही तफावत आढळून आलेली नाही. माहे डिसेंबर २०१६ च्या देयकावरील फोटोमध्ये २१३६१ इतके रिडींग दिसून येत असून सदर देयकामाध्ये चालू मीटर वाचन २१३६१ इतकेच व योग्य देण्यात आलेले आहे. सदर देयक कूण १७९७३ युनिटचे देण्यात आलेले आहे.

ग्राहकाचे प्रतिनिधी श्री संतोष दत्तात्रय वळीवडे यांनी देयकात नमूद केलेल्या १७९७३ युनिटच्या वापरा बद्दल आपला आक्षेप नसल्याचे मंचाकडे कथन केले जर ग्राहकाने वरील वीज वापर मान्य केला असेल तर त्या प्रमाणात ग्राहकाने त्याचे वीज बिल भरणे क्रमप्राप्त आहे. ही बाब देखिल त्यांनी मंचासमोर मान्य केली. मीटर वाचकाच्या चूकीच्या मीटर वाचनामुळे एवढया मोठया रक्कमेची थकबाकी दंड व व्याज भरावे लागत असल्याने ग्राहकाला जबरदस्त नुकसान होणार असल्याने ग्राहकातर्फे असे निवेदन करण्यात आले की जर दंड व व्याज माफ करुन निव्वळ थकबाकीची रक्कम हप्ते पाडून मिळणार असेल तर ग्राहक सदर रक्कम भरण्यास तयार आहे . सदरचे म्हणणे उपकार्यकारी अभियंता श्री अमर कोळी, उपविभाग कोडोली यांनी मान्य केले.

उभय पक्षकाराचे वरील निवेदन लक्षात घेता व न्यायाच्या दृष्टीने व उभय पक्षकारानी या मंचासमोर मान्य केल्याने खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) तक्रारदार हयांची मागणी मान्य करण्यात येत आहे.

२) डिसेंबर २०१६ च्या देयकामध्ये नमूद केलेल्या थकबाकीची रक्कम दंड व व्याज वगळून थकबाकीची निव्वळ रक्कम ग्राहकाला या आदेशाच्या तारखेपासून १२ त्रैमासिक हप्त्यात भरण्याची मूभा देण्यात येत आहे.

27/3/2016

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| 27/3 | 27/3/18 | 27/3/2018 |
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण